# राशिभविष्य - जुलै,२०२३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=====================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रासाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे,व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.

=====================================================**( १) मेष -**

या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे सतत काही ना काही कारणाने अपमान होणे संभवते. तसे घडल्यास मनात सूडभावना निर्माण होईल. जपा. येथील हर्षलमुळे स्वभाव चंचल, लहरी, अस्थिर होण्याची शक्यता जाणवते. कोणाचाही धाक,दडपण सहन होणार नाही. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर, हूड आचरणाची होणे संभवते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होऊ शकेल. येथील गुरु शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. तसेच तो सर्व प्रकारचे बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होईल व आरोग्य उत्तम राहील, सर्व सुख मिळेल, धनलाभ होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे शासकीय सेवेत असणारांपैकी काही मंडळींवर वरिष्ठ प्रसन्न होतील व क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, दु:ख, कौटुंबिक त्रास, कार्य दिरंगाई, आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यता जाणवते. येथील बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे हितशत्रूंचा त्रास होणे, अकारण शत्रुत्व निर्माण होणे, राजद्रोह होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो बऱ्याच प्रमाणात अनुकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल. पण त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होण्याची व संतति समस्या त्रस्त करण्याची शक्यताही जाणवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र असून तो महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व सुखकारकच होईल. शेतीवाडी असणारांना तो लाभदायक होईल. तसेच सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना आपल्या कलेत प्रगती होत असल्याचे समाधान लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळेही मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या तर कोणाची अनारोग्यविषयक समस्या त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत शनि असून तो आर्थिक दृष्ट्या अनुकुल असला तरी त्याच्यामुळे संततीपैकी कोणास त्रास होणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता निर्माण होण्याची शक्यता दिसते. पण तो गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नम::”

तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे आध्यात्मिक उपासनेद्वारे अध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल’ तसेच सामाजिक कार्यक्षेत्रात रस असणारांनाही तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील राहूमुळे नकली, दिखाऊ आचरण कराल. पण तो धनदायक होणेही संभवते. येथील हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, अपघात, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात आणि बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत जात आहेत. . अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक देणे व अधिक खर्चाची जबाबदारी वाढेल. शिवाय आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. काही मंडळींना डोळ्याचा आजार त्रस्त करीतसे दिसते. येथील बुधही दु:खदायकच होईल व त्याच्यामुळे हितशत्रूचा त्रास होणे, अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते.पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर गृहसौख्य व मित्रलाभ होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र आहेच.पण तो महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व लाभदायकच होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होणे संभवते. शासकीय नोकरीत असणारांपैकी क्वचित कोणाचा सन्मान केला जाईल व त्यातून त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होईल. . तसेच शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. कौटुंबिक सुखसमाधानही लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज. वाद, भांडणे होणे संभवते. तसेच असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, आचारविचार उच्च राहतील मनस्थिती उदार होईल व क्वचित कोणास प्रसिद्धीही मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत शनि असून तो चिकित्सक बौद्धिक व्यवसाय आणि लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक नुकसान, अर्थप्राप्तीस विलंब, अन्य आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. शिवाय कुमार्गी मित्रांमुळे असह्य मनस्ताप होईल. त्यातून नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, भांडणे, आर्थिक चिंता अस्वस्थ करण्याची शक्यता जाणवते. तसेच येथील बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या धनस्थानी जात असून नंतर महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे धननाश, कुसंगती, मित्रद्रोह, शत्रुत्व निर्माण होणे व हितशत्रूपासून धोका

असणे संभवते. मनस्थिती अस्थिर, चंचल होईल पण तो  धनदायक होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र असून तो महिन्याच्या पूर्वार्धातच या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे हा शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायकच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान प्राप्त होईल. काही मंडळींना  धनलाभ तर काहींना भूमिलाभ प्राप्त होणे संभवते. तसेच कोणाचा सन्मान होऊन प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता दिसते.या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ आहेच. त्याच्यामुळे महत्त्वाकांक्षा  वाढेल, हातून काही कर्तृत्व घडेल; पण त्याच्यामुळे एखादी इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी तुळा  राशीत केतु असून तो अध्यात्म, गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल  व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे काही मंडळींना पोटाचे अनारोग्य त्रस्त करीलसे  दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत शनि असून तो वकिलीसारखे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील; पण तो मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार असणारांना  अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होणे संभवते, काही मंडळींना वाहनसुख मिळेल, काहींना विवाहयोग येईल, विद्यार्थी शिक्षणात प्रगती करू शकतील, व मित्रवाढ होईल. येथील हर्षलमुळे  सर्व काही अनिश्चित असेच घडेल.  शिवाय मित्रांशी भांडणे होणे संभवते. येथील राहू बुद्धिमान मंडळींना अनुकुल होईल, शासकीय नोकरीत अधिकार पद असणारांपैकी काही जणांच्या  मनात वाममार्ग धन प्राप्त करून घेण्याचा विचार प्रबळ होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो विचार मनातून काढून टाकावा.  नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ  लागणार नाही. श्रद्धा असेल तर शिवोपासना व दुर्गादेवी उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे आणि “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः:शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात व बुध  महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. त्यानंतर बुध  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. त्याशिवाय अनारोग्य होणे, थकवा येणे.,मनस्ताप होणे, कसली तरी चिंता  त्रस्त करणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. बुधामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्य,  अस्थिर मनस्थिती, अपयश, मानहानी, आर्थिक चिंता, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा अशापैकी काही घटना घडणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे  काही दु:खदायक घडले तरी तो धनदायक होणेही संभवते. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून शुक्र आहेच. पण तो महिन्याच्या पूर्वार्धातच या राशीच्या धनस्थानी सिंह  राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो  संपूर्ण महिन्याच्या काळात  अनुकुल   व सुखदायकच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. शिवाय धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे घरात कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. तसेच तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ  नका. या राशीच्या अष्टम

स्थानी कुंभ राशीत शनि असून तो दु:ख दैन्यकारक असून त्याच्यामुळे कसला तरी विचित्र आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. शिवाय तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गुरु-हर्षल -राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु व हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होतील. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर प्रसन्न होतील, काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. शिवाय क्वचित कोणाचा मानसन्मान होणेही संभवते. पण येथील राहूमुळेही काही नोकरदार मंडळींना अधिकार पद मिळू शकेल. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना" अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यय स्थानी कर्क राशीत जात आहे. तसेच येथील बुध महिन्याच्या पूर्वार्धातच या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्यय स्थानी कर्क राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. शरीरपीडा होईलच; पण मानभंग होण्याची दाट शक्यता जाणवते. बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण त्यानंतरचा संपूर्ण काळ तो पुष्कळसा प्रतिकुलच होईल व अनारोग्य, अपयश, मानहानी, धननाश,मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र आहेच. पण तो महिन्याच्या प्रथम सप्ताहातच या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, सर्व प्रकारे सुखकारक व लाभदायकच होईल. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार असतील, अकारण श्रम, दगदग कराल. व त्यातून अनारोग्य होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण इतरांना त्याच्यामुळे मानसिक दु:खच सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील. पण विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो जलभकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत गुरु -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे प्रगतीच्या संधी मिळतील, प्रवासयोग संभवतो, शिवाय अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. येथील हर्षल शास्त्रीयसंशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. येथील राहू फिरतीची नोकरी असणारांना अनुकुल होईल व काही मंडळींच्या अंगी सभाधीटपणा येईल. श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी

स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतीलसे दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत शनि असून तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे, गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे संभवते. तसेच अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. येथील राहू अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे ज्या मंडळींच्या हाती अधिकारपद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अस्वस्थ करील. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. येथील हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात
अनुकुल, आर्थिक दृष्ट्या प्रगतिकारक, सर्व प्रकारे सुखदायकच होतील. काही नोकरदार मंडळींना नोकरीत बढती, अधिकार पद मिळेल; तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. तसेच मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मित्रलाभ होईल. पण येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्यय स्थानी सिंह गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानहानी, अपयश येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र आहेच व तो महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात सर्व प्रकारे सुखदायकच होईल व मन:शांती लाभेल. शिवाय तो धनदायक होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र
चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे सुख,ऐषाराम लाभेल. पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे सतत सावधानतेने मार्गक्रमण करा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वार्थ वृत्ती प्रबळ होईल. बुद्धी संशयी होईल. पण चिकाटीने खोल विचार करण्याची बुद्धी देणारा असल्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामूळे उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना कसली तरी काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना आपली फसवणूक झाल्याचे दु:ख त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रेमसंबंध दृढ होईल. अर्थलाभ होईल. विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. काही मंडळींना प्रवासयोगही येईल. राहूमुळे मनात

कपटी विचार येतील.  विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील  सुखात बाधा येणे संभवते. येथील हर्षलमुळेही पतिपत्नीत गैरसमज, वाद, भांडणे, लहरी आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी  काहीही कारणाने  भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी  मिथुन  राशीत रवि -बुध  असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच  होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, अनारोग्य, निराशा, वडील मंडळींचा विरोध  अशापैकी कारणांनी मनस्ताप होईल व अस्वस्थ व्हाल. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो नोकरी-व्यवसाय काहीही असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात प्रतिकुल होईल; पण नंतरच्या उर्वरित  काळात अनुकुल होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून  शुक्र असून तो महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात तो दु:खदायक होईल व दैनंदिन कार्यात अडथळे निर्माण होतील. पण नंतरच्या संपूर्ण  महिन्याच्या काळात तो अनुकुल व सुखकारकच होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर  श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची  उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे  नमः:”तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी ओम वायवे नमः:” तर मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत शनि असून  त्याच्यामुळे दु:ख, कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे  शक्य होईल. तसेच गूढ संशोधनातकार्यरत असणारांना  प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत गुरु -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून गुरुमुळे  आरोग्य सुधारेल पण राहूमुळे अनारोग्य होणे संभवते.शिवाय परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे व्यवसायात लाभ होतील. पण हर्षलमुळे डोकेदुखीचा त्रास होणे  संभवते. म्हणून सतत खोल विचार करत बसू नका. नपेक्षा  मेंदूविकार होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी  मिथुन राशीत  रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात  प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, अनारोग्य होईल, मानसिक ताण  सहन करावा लागेल, बुध  महिन्याच्या संपूर्ण काळात बराचसा अनुकुल  व सुखदायकच होईल; पण मधूनच कार्यदिरंगाई होणे, अडथळे,अडचणी येणे संभवते. शिवाय भांडणे होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकूल होईल व त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, सुख, ऐषाराम प्रा[त होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुलच होईल व नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. दु:ख सहन करावे लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना  अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.  त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा

स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी तर काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे गैरसमज, अन्य घोटाळे अशापैकी कारणांनी घरगुती वातावरण अशांत राहणे संभवते. या राशीचा पंचम स्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु पूर्णपणे अनुकुल व सुखकारकच होईल. त्याच्यामुळे आर्थिक लाभ होतील व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. येथील हर्षल सुद्धा उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे क्वचित कोणास अंतर्ज्ञानशक्ती प्राप्त होणेही संभवते. पण या पंचम स्थानी असलेला राहू मात्र प्रतिकुलच होईल व गुरु-हर्षलमुळे मिळणाऱ्या सुखात बाधा निर्माण करीतसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, इच्छा अपेक्षा अपूर्ण राहणे, नियोजित कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच येथील बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत जात असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो केवळ या राशीच्या अष्टम स्थानी असतानाच अनुकुल, सुखकारक व यशदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र आहेच; पण तो महिन्याच्या प्रथम सप्ताहातच या राशीच्या भाग्यस्थानी सिह राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याचा काळात अनुकुल, सुखकारक, प्रगतिकारक व लाभदायकच होईल. त्याच्यामुळे थोरामोठ्याची कृपा लाभेल व सुख, ऐषाराम, क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी प्राप्त होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तोही अनुकुल, यशदायक व धनदायकच होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना प्रवासयोग येणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:' तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच त्याच्यामुळे आर्थिक संकटे येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण तो अध्यात्म, गूढ संशोधन अशा कार्यक्षेत्रात रस असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे नियोजित कार्यात अपयश येणे, कौटुंबिक जीवनात त्रास, कटकटी, यांचा मनस्ताप सहन करावा लागणे; तसेच अनिष्ट घटना घडणेही संभवते. येथील हर्षलमुळे कशाही परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही.

सतत तक्रारी करत राहाल, कोणाशी पटणार नाही. वास्तुसुख मिळणार नाही. येथील गुरुमुळे कौटुंबिक सुख लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील व भाग्योदयकारकच होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत जात असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो केवळ सप्तम स्थानी असतानाच प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भांडणे होणे, दु:ख, मनस्ताप होणे संभवते. पण महिन्याच्या उर्वरित काळात तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायकच होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी प्रथमपासूनच शुक्र असून तो महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, सुखकारक व लाभदायकच होईल. त्याच्यामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल, ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवे काही करण्याचा मोह होईल; पण त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. आहे ती नोकरीच मनापासून करावी. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी ‘ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे दूरत्व होणे अशापैकी घटना घडणे संभवते. असे घडल्यास नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विविध प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गुरु-राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु-हर्षल बौद्धिक व उच्च बौद्धिक व्यवसाय असणारांना व लेखक मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होतील. काही मंडळींना प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण गुरुमुळे एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. येथील राहूमुळे मनस्थिती उदार, हरहुन्नरी होईल; हातून कर्तृत्व घडेल; पण बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन गहू असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण होणे, अपघात भय असणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे, संततीपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल व दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. येथील बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहातच या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत जात असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत जात आहे.

अशा परिस्थितीत तो केवळ षष्ठ स्थानी कर्क राशीत असतानाच अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊ शकेल. पण तो पंचम व सप्तम स्थानी असताना प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे बुद्धी मंद होईल, संतती-स्त्रीपासून मनस्ताप सहन करावा लागेल व भांडणे होतील व दु:ख सहन करावे लागेल.जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत प्रथमपासून शुक्र आहेच व तो महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात या राशीच्या सप्तमस्थानी सिंह राशीत गेल्यावर प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे दिखाऊ, ढोंगी आचरण होईल.. शिवाय संततिसुखात बाधा येईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल होईल व मानसिक संवेदना जलद होतील. त्यामुळे मन उदास होणे संभवते तसे झाल्यास गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत गुरु-हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील,आणि बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो प्रगतिकारक व यशदायक होईल. पण राहू मात्र वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता जाणवते. तसेच तो आर्थिक चिंता निर्माण करीतसे दिसते. येथील हर्षलमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होईल व हातून विचित्र आचरण घडेल व अविचाराने खर्च होईल शिवाय आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही समाजणार नाही. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, नोकरीत वरिष्ठांचा जाच, संततीविषयक चिंता आणि प्रिय जनांपासून दूरत्व होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. येथील बुध महिन्याचा ६ तारखेला या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत जात असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या उत्तरार्धातच अधिक अनुकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. धनलाभ होणेही संभवते आणि कार्यसिद्धी होऊ शकेल. पण तो पंचम स्थानी असताना मंद बुद्धी होईल, संतती-स्त्रीपासून त्रास होईल व कसल्या तरी भीतीमुळे मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत जात आहे.त्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेतील प्रगतीचा आनंद घेता येईल; पण तो या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत गेल्यावर आपल्या कलेतील प्रगती जगासमोर आणण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे संकटपरंपराच कोसळेल की काय असे वाटते. या काळात सर्व आर्थिक व्यवहार जपून व काळजीपूर्वकच करा. नपेक्षा नसते लचांड मागे लागेल व असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर

मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्र स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====∘∘∘∘∘0∘∘∘∘∘=====